## स्थायी समिती
## दाखल विषय – दि. ५/११/२०१८

**विषय क्रमांक :– १५३५ त्वर्य**

दि.१८/११/२०१८ ते दि.२०/११/२०१८ रोजी United Nations Conference Centre in Bangkok येथे प्लास्टिक कचरा विघटनाबाबत चर्चासत्र आयोजित केले असून सदर चर्चासत्रासाठी सह महापालिका आयुक्त, घनकचरा व्यवस्थापन यांना आमंत्रित केले असून Bangkok येथे उपस्थित राहणेसाठी खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/साप्र/६६५ दि. २/११/२०१८ चे पत्र.

१) दि.१८/११/२०१८ ते दि.२०/११/२०१८ रोजी United Nations Conference Centre in Bangkok येथे चर्चासत्रासाठी श्री.ज्ञानेश्वर मोळक, सह महापालिका आयुक्त, घनकचरा व्यवस्थापन यांना उपस्थित राहणेस

२) सह महापालिका आयुक्त, घनकचरा व्यवस्थापन यांचे साठी सदरचा कालावधी हा सेवाकाळ ग्राहय धरणेस व या कालावधीत मुख्यालय सोडणेस.

**विषय क्रमांक :– १५३६ त्वर्य**

कैलास स्मशानभुमी येथील बायोमेडीकल वेस्ट प्लांट येथे ट्रान्सफॉर्मर बसविणे व विद्युत विषयक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.जे.व्ही.एस.इंजिनिअरिंग यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ३३,८२,८०२=०८ पेक्षा ६% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३१,७९,८३३=९५ पर्यंत काम करून घेणेस व त्यांच्याशी करारनामा करणेस आणि त्यांनी केलेल्या कामापोटी बिल अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/विद्युत/६६० दि. २/११/२०१८ चे पत्र.

**विषय क्रमांक :– १५३७ त्वर्य**

प्रभाग क्र. ९ लक्ष्मी माता मंदिर ते दसरा चौक हायवे पर्यंत रस्ता विकसित करणे कामी टेंडर्स मागविली असता ठेकेदार मे.धनराज अस्फाल्ट कंपनी यांचे एकच टेंडर आले (टेंडर र.रु. २८,१५,४६१=६० पेक्षा ११% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.२५,०५,७६०=८२ पर्यंत काम करून घेणेस व त्यांचेबरोबर करार करणेस अधिक जीएसटी र.रुपये३,३७,८५५=३९ पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रुपये १,०९,९६९=५९ पर्यंत अधिक मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रुपये ३५,५४७/– अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेबरोबर करार करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/६६१ दि. २/११/२०१८ चे पत्र.

**विषय क्रमांक :– १५३८ त्वर्य**

शत्रुंजय चौक ते खडीमशीन चौक दरम्यान २४ मी.डि.पी. रस्ता विकसित करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.पेव्हवे कन्स्ट्रक्शन प्रा.लि. यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ४४,४५,६६६=४८ पेक्षा १४.००% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३८,२३,२७३=१७ उपलब्ध तरतुदीपर्यंत काम करून घेणेस व त्यांचेबरोबर करार करणेस अधिक जीएसटी र.रुपये ५,३३,४७९=९८ पर्यंत अधिक मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रुपये २०,७९१/– अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेबरोबर करार करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/६६२ दि. २/११/२०१८ चे पत्र.

**विषय क्रमांक :– १५३९ त्वर्य**

प्रभाग क्र. २८ ब मध्ये विविध ठिकाणी रस्ते डांबरीकरण करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.पेव्हवे कन्स्ट्रक्शन प्रा.लि. यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ८९,०२,४९४/– पेक्षा ५.००% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रुपये ८४,५७,३६९=३० पर्यंत काम करून घेणेस व त्यांचेबरोबर करार करणेस अधिक जीएसटी र.रुपये १०,६८,२९९/– पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रुपये २७,६२८/– पर्यंत अदा करणेस अधिक टेंडर अटीशर्तीनुसार डांबर, स्टील, सिमेंट या विशेष भाववाढ (स्टार रेट) सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/६६३ दि. २/११/२०१८ चे पत्र.

**विषय क्रमांक :– १५४० त्वर्य**

मा.हिंदु ह्रदय सम्राट शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे व्यंगचित्रकार कलादालन कार्टुनिस्टस कम्बाईन या संस्थेस दररोज २ तास विनामुल्य देणेबाबत मा.संजय भोसले व मा.विशाल धनवडे यांचे दि. २/२/२०१८ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. २१०३ दि. १२/२/२०१८ ला अनुसरुन मा.महा.आयुक्त यांनी क्र. मआ/बालगंधर्व/६६४ दि. २/११/२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

**विषय क्रमांक :– १५४१ त्वर्य**

प्रभाग क्र. १ ड (कळस धानोरी) मधील मुंजोबावस्ती येथील प्रायमरी ई–लर्निंग स्कुलचे उर्वरीत कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ७ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.सचिन कांबळे यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.१,१६,०१,४२९/– पेक्षा ११.९५% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रुपये १,०२,१५,०५८=२३ उपलब्ध तरतुदीपर्यंत काम करून घेणेस व त्यांचेबरोबर करार करणेस अधिक जी.एस.टी. र.रुपये १३,९२,१७१=४८ पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रुपये ५४,४१५=९० पर्यंत अधिक मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रुपये ५७,०१५/– पर्यंत अधिक अटीशर्तीतील विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/भवन/६६९ दि. ५/११/२०१८ चे पत्र.

**विषय क्रमांक :– १५४२ त्वर्य**

महापौर चषक २०१८ विविध क्रीडा स्पर्धांच्या आयोजनास व त्याप्रित्यर्थ १९-
होणाऱ्या खर्चासाठी आवश्यक बाबीस मान्यता मिळणेबाबत मा .क्र.यांचे जा (.वि)आयुक्त.महा.अति.
दि ६७०/.वि.क्री/मआ.५चे पत्र २०१८.११.

१. महापौर चषक २०१८-१९ स्पर्धा आयोजनाप्रित्यर्थ होणाऱ्या खर्चास ( रक्कम रु. ३९,०२,१५०/- पर्यंत होणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास )
२. स्पर्धेतील विजेते, उपविजेते तसेच प्राविण्य मिळविलेल्या खेळाडू/संघ यांना बक्षीसे चेकद्वारे आदा करणेस (रक्कम रु. ५७,२४,५००/- पर्यंत होणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास)
३. महापौर चषक २०१८-१९ स्पर्धा आयोजना दरम्यान उपस्थित पंचाना मानधन देणेकामी होणाऱ्या खर्चास (रक्कम रु. १५,०३,५००/- पर्यंत होणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास )
४. महापौर चषक स्पर्धादरम्यान उपस्थित खेळाडू, पंच व मदतनीस यांना स्पर्धा ठिकाणी चहा, नाश्ता व भोजन व्यवस्था करणेकामी होणाऱ्या खर्चास (क्रीडा विभागामार्फत निविदा प्रक्रिया राबवून रक्कम रु. ३०,००,०००/- पर्यंत प्रत्यक्ष होणाऱ्या खर्चास)
५. स्पर्धेतील विजेते खेळाडू/संघ यांना मेडल्स/ ट्रॉफिज देणेकामी पुरवठादारास प्रत्यक्ष कामाच्या प्रित्यर्थ होणारे बिल अदा करणेस(रक्कम रु.१०,००,०००/- पर्यंत प्रत्यक्ष होणाऱ्या कामाच्या मोबदल्यात मे.वेदपाठक क्रीएशन यांना बिल आदा करणेस )
६. स्पर्धे दरम्यान होणाऱ्या सामन्यांचे तसेच उदघाटन व समारोप समारभांचे आवश्यकतेनुसार विडीओ चित्रीकरण/ फोटोग्राफिचे काम करणाऱ्या ठेकेदारास त्याने केलेल्या प्रत्यक्ष कामाच्या प्रित्यर्थ होणारे बिल अदा करणेस (रक्कम रु.५,००,०००/- पर्यंत प्रत्यक्ष होणाऱ्या कामाच्या मोबदल्यात मे.टाईम्स व्हीजन यांना बिल अदा करणेस)
७. स्पर्धेच्या ठिकाणी आवश्यक मंडप व्यवस्था (स्टेज, टेबल व खुर्च्या) इत्यादी भवन रचना विभागामार्फत करण्यात येणार असल्याने भवन विभागाकडील पुरवठादारास खर्च आदा करणेस ( रक्कम रु. १,२५,००,०००/- पर्यंत होणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास)

८. स्पर्धेच्या ठिकाणी आवश्यक लाईट, साउंड व्यवस्था इत्यादी विद्युत विभागामार्फत करण्यात येणार असल्याने विद्युत विभागाकडील पुरवठादारास खर्च आदा करणेस ( रक्कम रु. ९०,००,०००/- पर्यंत होणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास)

९. राज्यस्तरीय स्पर्धेत सहभागी होणाऱ्या बाहेरगावच्या खेळाडूंना एस.टी. महामंडळाच्या तिकीट दराप्रमाणे प्रवास खर्च आदा करण्यात येईल.(रक्कम रु. ५,००,०००/- पर्यंत )

१०.महापौर चषक २०१८-१९ स्पर्धाकरिता होणाऱ्या इतर अनुषंगिक खर्च अदा करणेस).रक्कम रु.१०,००,००० -/पर्यंत(

११ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या शरीर सौष्टव महापौर चषक स्पर्धेसाठी श्री १० व ९ .दि. विजेत्याला र.लाख देणेस १ रुपये.हजार ऐवजी र ५० रुपये.

१२. सन २०१८ आयोजित पुणे महापौर चषक स्पर्धेतील शुटींग बॉल हि स्पर्धा १९- राज्यस्तरीय स्तरावर घेणेस.

**विषय क्रमांक :– १५४३ त्वर्य**

घोरपडी येथे पुणे–मिरज रेल्वे लाईन व पुणे–सोलापूर रेल्वे लाईन क्रॉसिंग येथे रेल्वे उड्डाणपूल बांधणे या कामाअंतर्गत भूसंपादन करणेसाठी वर्गीकरणाद्वारे आर्थिक तरतूद उपलब्ध करुन देणेसाठी खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मुअ(प्र)/६६६ दि. ५/११/२०१८ चे पत्र.

१) नदी सुधारणा योजने अंतर्गत उपलब्ध असलेल्या मुळा मुठा नदीकाठ विकसन प्रकल्प राबविणे या कामाचे र.रुपये१४६० लक्ष या तरतूदीमधून पुणे–सोलापूर रेल्वे लाईन वर (ROB-II) या कामामधील भुसंपादनाकरीता र.रु १००० लक्ष इतकी तरतूद वर्गीकरणाद्वारे उपलब्ध होणेस.

२) वरील दोन्ही उड्डाणपूलाकरीता महाराष्ट्र महानगरपालिका आधिनियम,१९४९ कलम ७२ ब नुसार र.रु १२५ कोटी इतकी प्रकल्पीय तरतूद करणेस.

३)सदर कामाकरीता सन २०१९–२०,२०२०–२१ व २०२१–२२ या आर्थिक वर्षामध्ये टप्प्याटप्प्याने तरतूद करणेस.

**विषय क्रमांक :– १५४४ त्वर्य**

अक्षयपात्र संस्थेमार्फत सद्यस्थितीत नागपूर महानगरपालिकेतील १३,५०० विद्यार्थ्यांना व ठाणे महानगरपालिकेतील ११,५०० विद्यार्थ्यांना दर्जेदार व आरोग्यदायी शालेय पोषण आहाराचा पुरवठा केला जातो. त्या अनुषंगाने अक्षयपात्र संस्थेस हडपसर–मुंढवा क्षेत्रिय कार्यालयामधील २६ मनपा शाळांमधील ११,००० विद्यार्थी, कोंढवा–येवलेवाडी क्षेत्रिय कार्यालयामधील ६ मनपा शाळांमधील ३८०० विद्यार्थी तसेच वानवडी–रामटेकडी क्षेत्रिय कार्यालयामधील २२ मनपा शाळांमधील ८,००० विद्यार्थी असे मनपा शाळांतील एकूण २२,८०० विद्यार्थ्यांना अक्षयपात्र या संस्थेस प्रायोगिक तत्वावर शालेय पोषण आहार पुरवठा करणेस परवानगी देण्यास मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/शिमं/६६७ दि. ५/११/२०१८ चे पत्र.

**विषय क्रमांक :– १५४५ त्वर्य**

सन २०१७–१८ या अंदाजपत्रकामध्ये विविध सार्वजनिक संस्थांचे नावे मान्य झालेल्या देणगीची रक्कम अदा करणेबाबत मा.अति.महापालिका आयुक्त(ज) यांचे जा.क्र.मआ/साप्र./५२२,दि.२५/०९/२०१८ चे पत्रावर झालेला विधी समिती ठराव क्र. १७ दि.११/१०/२०१८ विचारासाठी.

**विषय क्रमांक :– १५४६ त्वर्य**

मा.सौ.अश्विनी लांडगे यांचे दि. १/११/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र.६ क मधील नाले चॅम्पीयन मशिन व स्पायडर मशिनने साफसफाई करणेसाठी र.रु.१० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८–१९ चे अंदाजपत्रक, क. अंदाजपत्रक, २.मलनि:सारण, पान क्र.२६, अ.क्र. २, शहरामध्ये नाला चॅनलायझेशन करणे/नाल्याला सिमाभिंत बांधणे व तदनुषंगिक कामे करणे, (यादी क्र. एसडी ३), पान क्र.७२, अ.क्र.८, प्रभाग क्र. ६ क मध्ये आंबेडकर सोसायटी मध्ये नाल्यावर स्लॅब टाकून व्यवसायिकांसाठी स्टॉल उपलब्ध करुन देणे | १० लाख | --- |

| | | |
|---|---|---|
| नविन सुचविलेले काम<br>प्रभाग क्र.६ क मधील नाले चॅम्पीयन मशिन व स्पायडर मशिनने साफसफाई करणे | --- | १० लाख |

**विषय क्रमांक :– १५४७ त्वर्य**

मा.सौ.फरजाना शेख यांचे दि. १/११/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र.२ ब मधील पंचशीलनगर, कामगारनगर व विविध ठिकाणचे रस्ते काँक्रीटीकरण करणेसाठी र.रु.५ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८–१९ चे अंदाजपत्रक, अ व क मधील क्षेत्रिय कार्यालयाने करावयाची योजनेतर कामे, येरवडा–कळस–धानोरी क्षेत्रिय कार्यालय, पान क्र.७/४६, RE20A301/W2-448, प्रभाग क्र.२ ब मधील पंचशीलनगर, कामगारनगर व विविध ठिकाणचे रस्ते डांबरीकरण करणे | ५ लाख | --- |
| नविन सुचविलेले काम<br>प्रभाग क्र.२ ब मधील पंचशीलनगर, कामगारनगर व विविध ठिकाणचे रस्ते काँक्रीटीकरण करणे | --- | ५ लाख |

**विषय क्रमांक :– १५४८ त्वर्य**

मा.सौ.अल्पना वरपे यांचे दि. २/११/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र.१०क, मधील साईनाथ वसाहत व शास्त्रीनगर येथे नवीन ड्रेनेज लाईन टाकणे व तद्नुषंगिक कामे करणेसाठी र.रू.१० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८–१९ चे अंदाजपत्रक, क. अंदाजपत्रक, २.मलनि:सारण, पान क्र.२६, अ.क्र. २, शहरामध्ये नाला चॅनलायझेशन करणे/नाल्याला सिमाभिंत बांधणे व तद्नुषंगिक कामे करणे, (यादी क्र. एसडी ३), पान क्र.७२, अ.क्र.१६, प्रभाग क्र.१०क, उजवी भुसारी कॉलनी महाडकर सोसायटी जवळील नाल्याला सिमाभिंत लावणे | १० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम<br>प्रभाग क्र.१०क, मधील साईनाथ वसाहत व शास्त्रीनगर येथे नवीन ड्रेनेज लाईन टाकणे व तद्नुषंगिक कामे करणे | --- | १० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्रमांक :– १५४९ त्वर्य**

मा.सौ.मंगला मंत्री यांचे दि. ५/११/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र.२१ क मधील घोरपडी गाव स.नं.६७ अ येथे ॲम्युनिटी स्पेस जागेमध्ये अग्निशामक केंद्रासाठी इमारत बांधणेसाठी र.रू.३० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८–१९ चे अंदाजपत्रक,<br>१) २. प्राथमिक शिक्षण, पान क्र. ९८, अ.क्र. ११, प्राथमिक शाळेसाठी नविन इमारत बांधणे, वर्गखोल्या बांधणे, मैदाने विकसित करणे व मूलभूत सोयीसुविधांसाठी विविध विकास कामे करणे, (यादी क्र.एसजे २), पान क्र. २३९, अ.क्र. ९२, प्रभाग क्र. २१ क मध्ये स. नं. ७० घोरपडी गांव शाळेसाठी आरक्षित जागेवर इमारत बांधणे | २० लाख | --- |
| २) १२.भवने, भूमी व मनपा वसाहती यांची व्यवस्था, पान क्र. ११०, अ.क्र. ७, शहरामध्ये विविध ठिकाणी सिमाभिंत बांधणे, भवन विभागांतर्गत विविध विकासाची कामे करणे (यादी क्र. एसजे १०), पान क्र.२५२, अ.क्र.२१०, प्रभाग क्र. २१ क मध्ये स. नं. ७३ बी.टी.कवडे रोड लायब्ररीची इमारत बांधणे | १० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम<br>प्रभाग क्र.२१ क मधील घोरपडी गाव स.नं.६७ अ येथे ॲम्युनिटी स्पेस जागेमध्ये अग्निशामक केंद्रासाठी इमारत बांधणे | --- | ३० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्रमांक :– १५५० त्वर्य**

मा.सौ.निलीमा खाडे यांचे दि. ५/११/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र.१४ ब मधील पी.एम.सी. कॉलनी येथे विविध दुरुस्ती कामे करणेसाठी र.रू.१० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८-१९ चे अंदाजपत्रक, १२.भवने, भूमी व मनपा वसाहती यांची व्यवस्था, पान क्र. ११०, अ.क्र. ७, शहरामध्ये विविध ठिकाणी सिमाभिंत बांधणे, भवन विभागांतर्गत विविध विकासाची कामे करणे (यादी क्र. एसजे १०), पान क्र.२५०, अ.क्र.१४२, प्रभाग क्र.१४ ब मधील जय भिम मित्र मंडळ येथे जुना समाज मंदिराचा दुसरा मजला वाढवून वरील मजल्यावर व्यायामशाळा बांधणे | १० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम<br>प्रभाग क्र.१४ ब मधील पी.एम.सी. कॉलनी येथे विविध दुरुस्ती कामे करणे | --- | १० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्रमांक :– १५५१ त्वर्य**

मा.सौ.कालिंदा पुंडे यांचे दि. ५/११/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र.२५ ब मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू.२० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८-१९ चे अंदाजपत्रक, क. अंदाजपत्रक, २.मलनि:सारण, पान क्र. २६, अ.क्र. १, शहरामध्ये मलवाहिन्या विकसित करणे, (यादी क्र. एसडी २),<br>१) पान क्र.६२, अ.क्र.६६४, प्रभाग क्र. २५ ब मध्ये लक्ष्मीनगर येथे ड्रेनेज लाईन टाकणे<br>२) पान क्र.६२, अ.क्र.६६५, प्रभाग क्र. २५ ब मध्ये आझादनगर येथे ड्रेनेज लाईन टाकणे | <br><br>१० लाख<br>१० लाख | <br><br>---<br>--- |
| नविन सुचविलेली कामे<br>१)प्रभाग क्र.२५ ब मध्ये विविध ठिकाणी मोठ्या व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे<br>२)प्रभाग क्र.२५ ब मध्ये ड्रेनेज लाईन साफसफाई व ड्रेनेज विषयक कामे करणे | <br>---<br>--- | <br>१० लाख<br>१० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्रमांक :– १५५२ त्वर्य**

मा.अनिल टिंगरे यांचे दि. ५/११/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र.१ ड (कळस-धानोरी) मध्ये विविध ठिकाणी विद्युत विषयक कामे करणेसाठी र.रू.१० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८-१९ चे अंदाजपत्रक, ७.आरोग्य विभाग, पान क्र. १००, अ.क्र. १३, शहरामध्ये नव्याने दवाखाने, प्रसुतिगृह बांधणे, शहरातील दवाखान्यांसाठी विविध उपकरणे खरेदी करणे, विविध विकास कामे करणे, (यादी क्र. एसजे ६), पान क्र.२४२, अ.क्र.५, प्रभाग क्र.१ ड (कळस-धानोरी) मधील आरोग्य विषयक विविध उपाययोजना करणे | १० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम<br>प्रभाग क्र.१ ड (कळस-धानोरी) मध्ये विविध ठिकाणी विद्युत विषयक कामे करणे | --- | १० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्रमांक :– १५५३ त्वर्य**

मा.सौ.दिशा माने यांचे दि. ३/११/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र.३५ अ मधील सन २०१७-१८ च्या अपुर्ण कामांसाठी सन २०१८-१९ मधील तरतुद वापरुन शिल्लक रकमेचे वर्गीकरण करण्यास

प्रभाग क्र.३५ अ मधील सन २०१७-१८ च्या क्षेत्रिय व विक्रेंदीत स्तरावरील अपुर्ण कामांसाठी खालील तकत्याप्रमाणे सन २०१८-१९ मधील कामांची तरतुद वापरण्यात आली आहे.

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>बजेट कोड</th><th>सन २०१८-१९ मधील अंदाजपत्रकीय कामाचे नाव</th><th>तरतुद रक्कम (लक्ष)</th><th>आवश्यक तरतुद</th><th>शिल्लक तरतुद</th></tr>
<tr><td>१.</td><td>CE20A103/SA13-832</td><td>प्रभाग क्र.३५ अ मधील अक्षय गार्डन ते कलाशांती सोसायटी पर्यंतचा फुटपाथ करणे.</td><td>१०.००</td><td>३.८२</td><td>६.१८</td></tr>
<tr><td>२.</td><td>CE20A103/SA13-833</td><td>प्रभाग क्र. ३५ अ मधील राजीव गांधी ई लर्निंग स्कुल ते गजानन महाराज चौकापर्यंतचा फुटपाथ तयार करणे.</td><td>१०.००</td><td>९.२८</td><td>०.७२</td></tr>
<tr><td>३.</td><td>FE14A105/SG2-567</td><td>प्रभाग क्र ३५ अ मधील पद्मावती वसाहत येथील शौचालय दुरूस्त करणे.</td><td>१०.००</td><td>४.०३<br>४.२१</td><td>१.७६</td></tr>
<tr><td>४.</td><td>CE22A704/SJ20-233</td><td>प्रभाग क्र ३५ अ मधील चव्हाणनगर मधील तळजाई पठार येथील समाजमंदिर दुरूस्त करणे.</td><td>१०.००</td><td rowspan="2">१२.४५</td><td rowspan="2">७.५५</td></tr>
<tr><td>५.</td><td>CE27A241/SJ24-389</td><td>प्रभाग क्र ३५ अ मधील अण्णाभाऊ साठे वसाहत सहकारनगर नं २ येथील बांधलेल्या क्रीडा संकुल मध्ये अर्धवट राहिलेले फर्निचरचे काम पूर्ण करणे.</td><td>१०.००</td></tr>
<tr><td>६.</td><td>ZE16B102/SD2-2400</td><td>प्रभाग क्र ३५ अ मधील वनशिव वस्ती येथे ड्रेनेज लाईन टाकणे.</td><td>१०.००</td><td>५.०५<br>४.७७</td><td>०.१८</td></tr>
<tr><td>७.</td><td>ZE16B102/SD2-2401</td><td>प्रभाग क्र.३५ अ आण्णाभाऊ साठे वसाहत सहकारनगर नं. २ येथे ड्रेनेज लाईन टाकणे.</td><td>१०.००</td><td>६.९६<br>१.६७</td><td>१.३७</td></tr>
<tr><td>८.</td><td>ZE16B102/SD2-2404</td><td>प्रभाग क्र.३५ अ आंबेडकर वसाहत सहकारनगर नं.२ येथे ड्रेनेज लाईन टाकणे</td><td>१०.००</td><td>७.७६<br>०.८३</td><td>१.४१</td></tr>
<tr><td>९.</td><td>ZE16B102/SD2-2402</td><td>प्रभाग क्र.३५ अ शिवदर्शन ११६, ११७, चाळ येथे ड्रेनेज लाईन टाकणे</td><td>१०.००</td><td rowspan="2">१८.७४</td><td rowspan="2">१.२६</td></tr>
<tr><td>१०.</td><td>ZE16B102/SD2-2405</td><td>प्रभाग क्र.३५ अ मधील शंकर महाराज वसाहत येथे १८ इंच व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे.</td><td>१०.००</td></tr>
<tr><td></td><td></td><td>एकूण</td><td>१००.००</td><td>७९.५७</td><td>२०.४३</td></tr>
</table>

याप्रमाणे सन २०१८-१९ मधील कामाची तरतुद खालील २०१७-१८ च्या कामास वापरण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | टेंडर क्र. | सन २०१७-१८ मधील अंदाजपत्रकीय कामे | आवश्यक तरतुद |
|---|---|---|---|
| १. | ४७२/१७ | प्रभाग क्र.३५ अ विविध ठिकाणी फुटपाथ नविन करणे व तद्नुषंगिक काम करणे. | ३.८२ |
| २. | ४७३/१७ | प्रभाग क्र.३५ अ शिवदर्शन परिसरातील फुटपाथ दुरुस्त करणे | ९.२८ |
| ३. | ३१९/१७ | प्रभाग क्र.३५ अ तळजाई वसाहत विविध विकास कामे करणे | ४.०३ |
| ४. | २५६/१७ | प्रभाग क्र.३५ अ तळजाई पठार येथे शौचालयाची दुरुस्ती करणे | ४.२१ |
| ५. | १६३-EX-१७ | प्रभाग क्र.३५ अ येथील योगी अरविंद विविध प्रकारे दुरुस्ती करणे व वरचा मजला | १२.४५ |
| ६. | ४१५/१७ | प्रभाग क्र.३५ अ आण्णाभाऊ साठे वसाहत सहकारनगर नं. २ येथे विविध विकासाची कामे करणे. | ५.०५ |
| ७. | २७६/१७ | प्रभाग क्र.३५ अ शंकर महाराज वसाहत येथे ड्रेनेज लाईन टाकणे व काँक्रीटीकरण करणे. | ४.७७ |
| ८. | ४१६/१७ | प्रभाग क्र.३५ अ गवळीवाडा गल्ली क्र. १ व २ येथे विविध विकास कामे करणे. | ६.९६ |
| ९. | २७९/१७ | प्रभाग क्र.३५ अ भाग्यश्री सोसायटी वनशिव वस्ती येथे ड्रेनेज लाईन टाकणे | १.६७ |
| १०. | ४९३/१७ | प्रभाग क्र.३५ अ विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे व काँक्रीटीकरण करणे. | ७.७६ |
| ११. | २४८/१७ | प्रभाग क्र.३५ अ चव्हाणनगर येथे विविध विकास कामे करणे. | ०.८३ |
| १२. | ८३-EX-१७ | प्रभाग क्र.३५ अ संभाजीनगर येथे विविध विकास कामे करणे. | १८.७४ |
| | | एकूण | ७९.५७ |

सन २०१८-१९ मधील कामांची एकूण तरतुद र.रुपये १००.०० लाख सन २०१७-१८ च्या कामास एकुण र.रुपये७९.५७ लाख वापरुन र.रुपये २०.४३ शिल्लक राहत आहेत. सन २०१८-१९ मधील कामांची एकुण शिल्लक तरतुद र.रुपये २०.४३ लाख या रक्कमेचे वर्गीकरण करुन खालील नविन काम करण्यात यावे.

| अ.क्र. | कामाचे नांव | तरतुद |
|---|---|---|
| १. | प्रभाग क्र.३५ अ मध्ये विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे व काँक्रीटीकरण करणे. | २०.४३ |

विषय क्रमांक :- १५५४ त्वर्य

मा. सौ. नंदा शरद जिचकार, महापौर, नागपूर महानगरपालिका व उपाध्यक्षा, महाराष्ट्र महापौर परिषद यांचे मार्फत महापौर परिषदेची १८ वी सभा शनिवार दि. २७ ऑक्टोबर २०१८ रोजी सकाळी १०.०० (दहा)वाजता वसंतराव नाईक राज्य कृषी विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था वनामती, व्ही.आय.पी. रोड, ट्रॉफिक पार्कजवळ, धरमपेठ, नागपूर येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस उपस्थित रहाणेकरिता मा. महापौर यांचे आज्ञेवरुन मे. हसमुख ट्रॅव्हल्स एजंट प्रा. लि. पुणे यांचे मार्फत पुणे ते नागपूर व नागपूर ते पुणे अशी विमान प्रवासाची तिकिटे आरक्षित करणेत आली असून त्याप्रित्यर्थ मे. हसमुख ट्रव्हल्स एजंट प्रा. लि., पुणे यांनी खालीलप्रमाणे बिल सादर केले आहे. सदरचे बिल प्रवास खर्च खात्यातून संबंधितांस अदा करणेची व्यवस्था करणेत यावी, असे मा. महापौर यांनी त्यांचे संदर्भ क्र. २ चे पत्रान्वये कळविले होते. सदरचे बिल खालीलप्रमाणे आहे.

| बिल क्र. | दिनांक | प्रवास | रक्कम रूपये |
|---|---|---|---|
| १०१७९८० | १७/१०/२०१८ | पुणे- नागपूर | ४,८३१/- |
| | १७/१०/२०१८ | नागपूर - पुणे | ४,८३२/- |
| i) Additional Service Charges<br>ii) GST (9 % CGST + 9 % GST) | | | ६००/-<br>१०८/- |
| एकूण रक्कम रूपये | | | १०,३७१/- |

तरी, सदर विमान प्रवासाचे एकुण रक्कम रुपये १०,३७१/- (अक्षरी रक्कम रुपये दहा हजार तीनशे एक्काहत्तर रुपये फक्त) चे बिल खालील अर्थशिर्षकावर खर्ची टाकून संबंधितांस बिल अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.नगरसचिव यांचे जा.क्र. ५३२३ दि. ५/११/२०१८ चे पत्र.

<u>सन २०१८ - २०१९ चे अंदाजपत्रक</u>

१. मुख्य देखरेख वसुली वगैरे,

क. महानगरपालिका व स्थायी समिती,

१. नगरसचिव यांचे कार्यालय, पान नं.३८,

४. प्रवास खर्च ( न.स. ) RE11A 104 मान्य तरतूद रक्कम रूपये १६,५६,०००/-

( अक्षरी रक्कम रुपये सोळा लाख छप्पन हजार फक्त )

सुनिल पारखी
नगरसचिव,
पुणे महानगरपालिका.